दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | बुधवार, 22 एप्रिल 2026 | अंक क्र. 332 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# स्व.अजितदादा पवार यांच्या नावाने वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापनेचा निर्णय घेणारी परळी वैजनाथ नगर परिषद ठरणार पहिली!

## अभिनव सेवाउपक्रम: परळी नगर परिषदेच्या वतीने 'स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष' होणार स्थापन



**लाभार्थ्यांचा शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी एकाच छताखाली सर्व सेवा**




■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळीत नगर परिषद क्षेत्रातील नागरिकांना शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ सुलभ, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा या उद्देशाने नगर परिषद कार्यालयात "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यास न.प.च्या स्थायी समितीने एकमताने मंजुरी दिली आहे.नगर परिषद स्थायी समितीच्या बैठकीत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे.दरम्यान, अशा प्रकारचा स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेणारी परळी नगर परिषद महाराष्ट्रात पहिली नगर परिषद ठरणार आहे.

नागरिकांना विविध आरोग्य योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया आणि पाठपुरावा यासाठी एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यात येणार आहे.या कक्षाच्या स्थापनेसाठी लागणारा खर्च नगर परिषद निधीतून किंवा शासन अनुदानातून मंजूर करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व इतर यंत्रणांशी समन्वय साधून नागरिकांना अधिकाधिक सुलभ वैद्यकीय सहाय्यता देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. स्थायी समितीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या बैठकीला नगराध्यक्ष सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, स्थायी समिती सदस्य वैजनाथ सोळंके, प्रा पवन मुंडे, सौ.अंजलीताई माळी,सौ जयश्रीताई गीते, योगेश मेनूकुदळे यांच्यासह नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, सर्व अधिकारी, विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

### एकाच छताखाली उपलब्ध होणार सर्व सेवा...

■ "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाच्या विविध वैद्यकीय सहाय्यता योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत योजनेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन नोंदणी, संबंधित कार्यालयांशी समन्वय आणि लाभार्थ्यांचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. या कक्षासाठी स्वतंत्र जागा, फर्निचर, संगणक, इंटरनेट, प्रिंटर आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय किमान एक प्रशिक्षित लिपिक/डेटा एंट्री ऑपरेटर आणि एक समन्वयक नियुक्त केला जाणार आहे.

■ नागरिकांना योजनांची माहिती देण्यासाठी माहितीपत्रके, हेल्पलाईन क्रमांक व मार्गदर्शक फलक लावण्यात येणार आहेत. तसेच प्राप्त अर्जांची नोंद ठेवून त्यांचा वेळेत पाठपुरावा करणे बंधनकारक राहणार आहे. कक्षाच्या कामकाजाचा मासिक अहवाल तयार करून मुख्याधिकारी आणि स्थायी समितीसमोर सादर केला जाणार आहे. नगर परिषद स्थायी समितीने हा महत्त्वाचा निर्णय घेत नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. या कक्षामुळे गरजू नागरिकांना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मोठी मदत होणार आहे. लवकरच नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्रातील पहिला सुसज्ज असा "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यान्वित करण्यात येईल अशी माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.



# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

## गेवराई तालुक्यात 2.66 लाखांचा गांजा जप्त, एकाला बेड्या!

■ बीड (प्रतिनिधी):

बीड जिल्ह्यातील अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) आपला मोर्चा वळवला असून, गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे २ लाख ६६ हजार ६४० रुपये किमतीचा गांजा जप्त केला असून एका आरोपीला अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, मौजे सिरसदेवी (ता. गेवराई) येथे एक तरुण बेकायदेशीररीत्या गांजा जवळ बाळगून त्याची चोरटी विक्री करत आहे. या माहितीची खात्री करून पोलिसांनी तातडीने सापळा रचला आणि सिरसदेवी येथील संबंधित इसमाच्या घरावर छापा टाकला.

### असा सापडला मुद्देमाल

■ पोलिसांनी टाकलेल्या या छाप्यात शेख रईस शेख युसूफ (वय २५ वर्षे, रा. सिरसदेवी) याच्या घरातून ८ किलो ८८८ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत याची किंमत अंदाजे २,६६,६४० रुपये इतकी आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध तलवडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२०/२०२६ नुसार एनडीपीएस (NDPS) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, अतुल हराळे तसेच तलवडा पोलीस ठाण्याचे सपोनि जंजाळ, पोउपनि अन्नलदास आणि त्यांच्या पथकाचा समावेश होता.

# नारीशक्तीचा एल्गार!

## मुंबईत भाजपचा भव्य 'जन आक्रोश मोर्चा' महिला आरक्षणावरून फडणवीसांचे विरोधकांवर टीकास्त्र

■ मुंबई: वृत्तसंस्था

लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावरून निर्माण झालेल्या राजकीय गदारोळाचे पडसाद आता रस्त्यावर उमटू लागले आहेत. महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या महाविकास आघाडी आणि राहुल गांधींच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी भाजप च्या वतीने वरळी येथे 'भव्य जन आक्रोश महिला मोर्चा' काढण्यात आला. या आंदोलनाद्वारे भाजपने आगामी संघर्षाचे रणशिंग फुंकले असून, विरोधकांच्या 'महिलाविरोधी' चेहऱ्याचा तीव्र शब्दांत निषेध केला.

लढा ३३ टक्के आरक्षणापर्यंत थांबणार नाही – देवेंद्र फडणवीस या विराट सभेला संबोधित करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर कडाडून टीका केली. ते म्हणाले, "संसदेत आणि विधानसभांमध्ये जोपर्यंत ३३ टक्के महिला लोकप्रतिनिधी म्हणून बसत नाहीत, तोपर्यंत हा लढा थांबणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऐतिहासिक पाऊल उचलले, पण आपली राजकीय दुकानदारी बंद होईल या भीतीने विरोधकांनी याला खो घातला आहे."

१ कोटी सह्यांची मोहीम: विरोधकांच्या या भूमिकेचा निषेध करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात एक कोटी महिलांच्या सह्यांची मोहीम राबवून ते निवेदन राहुल गांधींना पाठवले जाईल. शक्तीचा अपमान: राहुल गांधींचे 'शक्ती' नष्ट करण्याचे विधान म्हणजे साक्षात नारीशक्तीचा अवमान असल्याचे त्यांनी नमूद केले. आरक्षणाचे गणित: २०२९ च्या निवडणुकीत महिलांना आरक्षण मिळावे ही नरेंद्र मोदींची प्रामाणिक इच्छा आहे, परंतु परिसीमन आणि जनगणनेच्या तांत्रिक कारणांचा आधार घेऊन विरोधक त्यात अडथळे आणत आहेत. या मोर्चात मुंबई आणि उपनगरातून हजारो महिला सहभागी झाल्या होत्या. राहुल गांधी आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या विरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम, माजी महापौर रितू तावडे यांच्यासह अनेक मंत्री, आमदार आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### विरोधकांचे सोंग उघडे पाडणार: देवेंद्र फडणवीस

■ सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांवर घणाघाती टीका केली. ते म्हणाले, "ज्यांनी २०२३ मध्ये या विधेयकाला केवळ देखाव्यासाठी पाठिंबा दिला होता, त्यांनीच आता आपली 'राजकीय दुकानदारी' बंद होईल या भीतीने खो घातला आहे. हे विरोधक केवळ महिलाविरोधीच नाहीत, तर संविधानविरोधी आणि दलित-आदिवासीविरोधीदेखील आहेत."




# परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रासमोर प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत उपोषण सुरू

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रामध्ये 'प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी' म्हणून शासन सेवेत सामावून घेण्याच्या न्याय मागणीसाठी प्रकल्पग्रस्तांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. सोमवार, २० एप्रिलपासून वीज केंद्र मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

**काय आहे मागणी?**

परळी औष्णिक विद्युत केंद्रासाठी जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या वारसांनी कुशल प्रशिक्षण पूर्ण केले आहे. या प्रशिक्षणार्थींना रिक्त पदांवर शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. अनेक वेळा निवेदने देऊनही प्रश्न मार्गी न लागल्याने अखेर या तरुणांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे.

या उपोषणामध्ये केशव दत्ता सरवदे, राधाकिशन देवराव सरवदे, करण भास्कर मुंडे, धनंजय बिभीषण फड, बालाजी राम बिडगर, समाधान माणिक मुंडे, मंगेश तुकाराम मुंडे, ओंकार गणेश फड, सुरेश बाळासाहेब फड आणि मगरध्वज बिभीषण बिडगर आदी प्रकल्पग्रस्तांचा समावेश आहे. हे सर्व उपोषणकर्ते परळी तालुक्यातील दाऊतपूर, वडगाव (दा.), डाबी, इंदपवाडी आणि तळेगाव परिसरातील रहिवासी आहेत. जोपर्यंत शासन सेवेत सामावून घेण्याबाबत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे न घेण्याचा निर्धार या तरुणांनी व्यक्त केला आहे. जोपर्यंत शासन सेवेत सामावून घेण्याचा लेखी आदेश मिळत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा निर्धार या प्रकल्पग्रस्तांनी व्यक्त केला आहे.



### जमिनी गेल्या, प्रशिक्षण झाले; मग नोकरी का नाही?

■ परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या उभारणीसाठी अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. याच प्रकल्पग्रस्तांच्या वारसांनी केंद्रात आवश्यक असलेले 'कुशल प्रशिक्षण' ही यशस्वीपणे पूर्ण केले आहे. मात्र, रिक्त पदे असतानाही या स्थानिक भूमिपुत्रांना डावलून इतर नेमणुका केल्या जात असल्याचा आरोप या तरुणांनी केला आहे. आमच्या जमिनी गेल्या, आता हक्काचा रोजगार कधी देणार ? असा संतप्त सवाल या तरुणांनी विचारला आहे.

## संपादकीय

# चला, पुन्हा जोडू या मातीशी नाते!

जागतिक वसुंधरा दिवसाच्या निमित्ताने यंदा 'आपली शक्ती, आपला ग्रह' ही संकल्पना जगभर राबवली जात आहे. केवळ मेसेज फॉरवर्ड करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून पृथ्वीला हिरवेगार कसे ठेवता येईल? देशी बियाणे, सेंद्रिय कापूस आणि प्लास्टिकमुक्तीच्या वाटेवरचे आपले पाऊल किती महत्त्वाचे आहे? जाणून घेऊ या या लेखातून...

कच्च्या तेलाच्या वाढत्या दरामुळे पॉलिस्टर महागले आणि कापसाची मागणी वाढली. काही वर्षांपूर्वी कापसाचे 'बीटी बियाणे' (जनुकीय सुधारित) विकसित झाले. या बियाणांमुळे उत्पादन वाढत असले तरी, कालांतराने त्याचे गंभीर दुष्परिणाम समोर येत आहेत. बीटी कापसाचा पालापाचोळा जमिनीत कुजल्यावर मातीतील सूक्ष्म जीवाणूंवर विपरीत परिणाम होतो. दरवर्षी नवीन बियाणे विकत घ्यावे लागते आणि मातीचा कस कमी झाल्याने रासायनिक खतांचा वापर अनिवार्य ठरतो, ज्यामुळे शेतीचा खर्च वाढतो. तसेच, बेकायदा 'एचटी बीटी' बियाणांमुळे 'ग्लायफोसेट'सारख्या तणनाशकांचा वापर वाढून पर्यावरणास घातक तणे तयार होतात. कापूस म्हणजे "पांढरे सोने"; सिंधू संस्कृतीच्या अभ्यासानुसार भारतात सुमारे ७००० वर्षांपासून कापूस पिकवला जात आहे. हे 'कापूस पुराण' मांडण्याचे कारण म्हणजे २२ एप्रिल रोजी साजरा होणारा 'वसुंधरा दिवस'. पृथ्वीच्या संरक्षणाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि जनजागृती करण्याचा हा एक महत्त्वाचा दिवस.

आज आपण वापरतो ते कपडे खरोखरच पर्यावरणस्नेही आहेत का? वस्त्रोद्योगात ७०,००० हून अधिक कृत्रिम रसायने वापरली जातात, त्यापैकी केवळ २ टक्के सुरक्षित आहेत. 'पर्यावरणस्नेही कापड' म्हणजे ते उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर नैसर्गिक असावे. कॉर्पोरेट कंपन्यांनी ग्राहकांचा जो गोड गैरसमज करून दिला आहे, त्याला 'बाहेर बरवा, आत हिरवा' ही म्हण चपखल लागू पडते. या क्षेत्रात श्रीरंग देवबा लाड यांनी स्वतःचे नैसर्गिक तंत्रज्ञान विकसित केले, ज्याबद्दल त्यांना २०२६ मध्ये 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी कापसाच्या फांद्यांचा सखोल अभ्यास करून शेंडा खुडणी, अतिघन लागवड आणि ठिबक सिंचन यांसारख्या नैसर्गिक पद्धती अवलंबल्या. यामुळे बोंडाचे वजन वाढले, किडींचा प्रादुर्भाव कमी झाला आणि मातीचा ओलावा टिकून राहिल्याने शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी होऊन नफा वाढला. दुसरे उदाहरण व्ही. आर. अनंथू यांचे आहे. त्यांनी शेतकऱ्यांना जनुकीय बियाणे व रसायने सोडून शाश्वत देशी बियाणे वापरण्याचे प्रशिक्षण दिले. देशी कापसाचे 'सरळ वाण' संरक्षित करून, सेंद्रिय पद्धतीने कापूस उत्पादन ते कापड विघटनापर्यंतची सर्व प्रक्रिया नैसर्गिक ठेवली. कुशल कामगारांकडून हातमागावर विणलेल्या या कापडाला अपराजिता, हळद, मंजिष्ठा आणि पळस यांसारख्या नैसर्गिक रंगांनी सजवले जाते. अगदी बटणेही नारळाच्या करवंटीपासून बनवली जातात. हे कापड नैसर्गिक असल्याने त्याचे विघटनही सहज होते, अशा प्रकारे खऱ्या अर्थाने वसुंधरेचे देणे वसुंधरेला परत दिले जाते.

वसुंधरा दिवसाची सुरुवात १९७० मध्ये अमेरिकेत झाली. युनेस्को परिषदेत शांतता कार्यकर्ते जॉन मॅककॉनेल यांनी मांडलेल्या प्रस्तावानंतर, सिनेट सदस्य गेलॉर्ड नेल्सन यांनी या दिवसाची अधिकृत सुरुवात केली. आज १९० हून अधिक देशांत हा दिवस साजरा होतो.

सध्या आपली पृथ्वी हवामान बदल, प्रदूषण आणि जंगलतोड यांसारख्या संकटांचा सामना करत आहे. निसर्गाचे रक्षण ही केवळ सरकारची नाही, तर प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. या वर्षीच्या वसुंधरा दिनाची संकल्पना 'आपली शक्ती, आपला ग्रह' ही आहे. यात 'आपली शक्ती' म्हणजे प्रत्येक मानवाचे वैयक्तिक योगदान. आपण पुढील गोष्टी करू शकतो.

१. वृक्षारोपण : केवळ झाडे लावू नका, ती जगवा. २. प्लास्टिक त्याग : एकेरी वापराच्या प्लास्टिकवर बंदी घालून कापडी पिशव्या वापरा. ३. बचत : पाणी आणि विजेचा अपव्यय टाळा. ४. कचरा व्यवस्थापन : ओला व सुका कचरा वेगळा करून 'पुनर्वापर' संस्कृती रुजवा. ५. कमी प्रदूषण : जवळच्या प्रवासासाठी सायकल वापरा किंवा चालत जा.

निसर्ग आपली गरज पूर्ण करू शकतो, पण हाव नाही," हे महात्मा गांधींचे विचार आजही लागू होतात. पृथ्वी आपली माता आहे आणि वाढत्या स्वार्थामुळे आपण तिचे शोषण करत आहोत. वसुंधरा दिवस हा केवळ एक दिवसाचा सोहळा न राहता, तो आपल्या जीवनशैलीचा भाग बनायला हवा. आपली पृथ्वी हिरवीगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू या.



# वसुंधरेची आर्त हाक : विकासाच्या वाटेवर शाश्वतपणाचा ध्यास : डॉ. राजेंद्र बगाटे

**दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ दिनविशेष नसून पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली एक गंभीर जाणीव आहे. मानवाने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अभूतपूर्व विकास साधला असला तरी या विकासाच्या बदल्यात पृथ्वीच्या संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट यांसारख्या समस्यांनी आज संपूर्ण जगाला वेढले आहे. अशा परिस्थितीत वसुंधरा दिन हा केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक आहे. पृथ्वी ही आपली केवळ राहण्याची जागा नसून ती आपली 'आई' आहे, जी आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि जीवन देत असते. त्यामुळे तिच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकाची नैतिक कर्तव्य आहे.**

वसुंधरा दिनाची सुरुवात १९७० साली झाली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा हा एक मोठा जागतिक उपक्रम ठरला. सुरुवातीला काही देशांपुरता मर्यादित असलेला हा दिवस आज जगभरातील जवळपास सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचे विविध कार्यक्रम, मोहिमा, जनजागृती उपक्रम राबवले जातात. परंतु केवळ एक दिवस साजरा करून पर्यावरण वाचणार नाही, तर हा विचार आपल्या दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला पर्यावरणीय संकटाचे स्वरूप अत्यंत भीषण झाले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकाने वापर होत आहे. जंगलांची मोठ्या प्रमाणात तोड केली जात आहे, ज्यामुळे वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषणाने ग्रासले आहेत. हवेत विषारी वायूंचे प्रमाण वाढले आहे. या सर्व घटकांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्याला 'जागतिक तापमानवाढ' असे म्हणतात. या तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मानवी जीवनच धोक्यात आले आहे.

हवामान बदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे, तर काही ठिकाणी दुष्काळाचे संकट निर्माण होत आहे. कृषी क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान सहन करावे लागत आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समस्यांचा परिणाम केवळ निसर्गावरच नव्हे, तर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होत आहे.

पर्यावरणाच्या ऱ्हासामागे मानवी हस्तक्षेप हा प्रमुख कारण आहे. 'विकास' या नावाखाली आपण निसर्गाचा विनाश करत आहोत. मोठमोठे प्रकल्प, धरणे, रस्ते, कारखाने यासाठी जंगलांची तोड केली जाते. नद्या वळविल्या जातात. खनिज संपत्तीच्या उत्खननासाठी पर्वत उध्वस्त केले जातात. या सर्व प्रक्रियेमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. निसर्गाच्या या असंतुलनाचा परिणाम शेवटी मानवावरच होतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे.

'शाश्वत विकास' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर पुढे आली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास, जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. म्हणजेच, नैसर्गिक संसाधनांचा वापर करताना त्यांचे संवर्धन आणि पुनर्निर्मिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. ऊर्जा, पाणी, जमीन यांचा वापर मर्यादित आणि योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब, कचऱ्याचे पुनर्वापर यांसारख्या उपाययोजना यासाठी महत्त्वाच्या आहेत.

जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवनाचा पाया आहे. विविध प्रकारचे वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. परंतु मानवी क्रियांमुळे जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जंगलांचे संवर्धन, वन्यजीव संरक्षण, नैसर्गिक अधिवासांचे जतन यावर भर देणे गरजेचे आहे.

जलसंकट ही आणखी एक गंभीर समस्या आहे. पाणी हे जीवनासाठी अत्यावश्यक आहे. परंतु आज अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. भूजलाचा अतिरेकाने वापर, पावसाच्या पाण्याचा अपुरा साठवण, नद्यांचे प्रदूषण यामुळे जलस्त्रोत आटत आहेत. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा योग्य वापर, जलप्रदूषण रोखणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

कचरा व्यवस्थापन हा देखील पर्यावरण संवर्धनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिकचा वाढता वापर हा पर्यावरणासाठी मोठा धोका ठरला आहे. प्लास्टिक विघटनास खूप वेळ लागतो, त्यामुळे ते जमिनीवर, पाण्यात साचून राहते आणि प्रदूषण वाढवते. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. 'कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा मंत्र अंगीकारणे गरजेचे आहे.

पर्यावरण संवर्धनात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शिक्षण प्रणालीत पर्यावरण शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.


शासन आणि धोरणे यांचीही पर्यावरण संवर्धनात महत्त्वाची भूमिका आहे. पर्यावरणपूरक धोरणे राबवणे, प्रदूषण नियंत्रणाचे नियम कडक करणे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे यासाठी शासनाने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे. परंतु केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आजच्या काळात तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून पर्यावरण संवर्धन शक्य आहे. सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जल ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर, हरित इमारतींची उभारणी, स्मार्ट शहरांची संकल्पना यामुळे पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो.

वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने काही ठोस संकल्प करणे आवश्यक आहे. झाडे लावणे, पाणी वाचवणे, कचरा कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारख्या लहान उपाययोजना देखील मोठा फरक घडवू शकतात. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून ती आपल्या अस्तित्वाची गरज आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर पर्यावरणीय समस्या या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी निगडित आहेत. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता, संसाधनांचे असमान वितरण, गरिबी, लोकसंख्येचा दबाव यामुळे पर्यावरणावर ताण वाढतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधला जाईल.

शेवटी, वसुंधरा दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून आपण तिचे केवळ पालक आहोत. पुढील पिढ्यांसाठी ही पृथ्वी सुरक्षित आणि समृद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील पिढ्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे आता वेळ आली आहे, की आपण विकासाच्या नव्या वाटा शोधू, ज्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत असतील. वसुंधरेच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले, तरच पृथ्वीवरील जीवनाचा प्रवाह अखंडित राहील.






■ डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# मुंबई इंडियन्सचा सलग चौथा पराभव, पंजाबचा विजय, किंग्स झाले IPL टॉपर

■ **मुंबई वृत्तसंस्था**

पंजाब किंग्सने इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मधील अपराजित मालिका कायम राखली. गुरुवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर श्रेयस अय्यरच्या संघाने यजमान मुंबई इंडियन्सचा दारूण पराभव केला. मुंबईचा हा सलग चौथा पराभव ठरला आणि ते आयपीएल २०२६ गुणतालिकेमध्ये नवव्या क्रमांकावर राहिले. पंजाब किंग्जने या विजयासह ९ गुणांसह अव्वल स्थानावर झेप घेताना आरसीबी व राजस्थान रॉयल्स यांना मागे ढकलेले. मुंबईच्या गचाळ क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजीमुळे क्विंटन डी कॉकचे वादळी शतक व्यर्थ गेले.

२ बाद १२ धावांवरून मुंबईला २०० पार जाण्याचे स्वप्न क्विंटन डी कॉक आणि नमन धीर यांनी दाखवले. अर्शदीप सिंगने दोन चेंडूंवर दोन विकेट्स घेऊन पंजाबला चांगली सुरुवात करून दिली. पण, त्यानंतर नमन व क्विंटन यांनी ६८ चेंडूंत १२२ धावा जोडल्या. नमन ३१ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ५० धावांवर बाद झाला. क्विंटन ६० चेंडूंत ८ चौकार व ७ षटकारांसह ११२ धावांवर नाबाद राहिला.अर्शदीप सिंहचे चार षटकांमध्ये २२ धावा देत तीन बळी घेतले. या सामन्यात त्याने चमकदार कामगिरी करत आयपीएलमध्ये १५० बळी घेण्याचा विक्रम केला आहे.

आयपीएलमध्ये तीन वेगवेगळ्या फ्रँचायझीकडून शतक झळकावणारा क्विंटन हा तिसरा ( लोकेश राहुल व संजू सॅमसन) फलंदाज ठरला. नमनची विकेट पडल्यानंतर मुंबईच्या धावांची गती मंदावली आणि



त्यांना ६ बाद १९५ धावांपर्यंतच पोहोचता आले. त्यांनी २०-२५ धावा कमीच केल्या. प्रियांक आर्य व प्रभसिमरन सिंग यांनी लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्याच षटकात २१ धावा चोपल्या आणि ही त्यांची पहिल्या षटकातील सर्वोत्तम धावसंख्या ठरली. यापूर्वी हैदराबादविरुद्ध मागील सामन्यात त्यांनी १८ धावा चोपल्या होत्या. पण, अल्लाह गझनफरने सलग दोन षटकांत पंजाबच्या प्रियांश आर्य ( १५) व कूपर कॉनली ( १७) यांना माघारी पाठवले.

पंजाबने ४५ धावांवर दोन फलंदाज गमावले. हार्दिक पांड्याच्या गोलंदाजीवर प्रभसिमरनचा झेल जसप्रीत बुमराहने सोडला. त्याचा फायदा उचलून त्याने २४ चेंडूंत अर्धशतक झळकावले. मुंबईची गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण गचाळ झालेले पाहायला मिळाले. पंजाब किंग्स ने १० षटकांत १०० धावा फलकावर चढवल्या होत्या. पंजाब किंग्सकडून सर्वाधिक दहा ५०+ धावांचा पराक्रम प्रभसिमरनने नावावर केला. डेव्हिड मिलर ( ९) व शॉन मार्श ( ६) या विक्रमात त्याच्या मागे आहेत. कर्णधार श्रेयस अय्यरसोबत त्याने ५५ चेंडूंत शतकी भागीदारी पूर्ण केली.

प्रभसिमरनने मुंबईच्या गोलंदाजांना चांगलेच चोपले आणि मुंबईने १३ व्या षटकापर्यंतच पराभव पत्करावा लागला. श्रेयसने ३२ चेंडूंत अर्धशतक पूर्ण करून वानखेडेवरील त्याचा फिफ्टीचा दुष्काळ संपवला. शार्दूल ठाकूरला सलग दोन षटकार खेचून श्रेयसने सामना पंजाबच्या ताटात आणून ठेवला. तो ३५ चेंडूंत ५ चौकार व ४ षटकारांसह ६६ धावांवर झेलबाद झाला आणि प्रभसिमरनसह त्याने ६७ चेंडूंत १३९ धावांची मॅच विनिंग भागीदारी केली. पंजाबने १६.३ षटकांत १९८ धावा करून २१ चेंडू राखत ७ विकेट्सने विजय मिळवला. प्रभसिमनर ३९ चेंडूंत ११ चौकार व २ षटकारांसह ८० धावांवर नाबाद राहिला.जसप्रीत बुमराहला आजच्या सामन्यातही बळी मिळाला नाही. चार षटकांमध्ये त्याने ४१ धावा दिल्या, तर दुसरीकडे दीपक चाहरने २.३ षटकांमध्ये ४५ धावा दिल्याने तो महागडा गोलंदाज ठरला. हार्दिक पंड्याने ३ षटकांमध्ये ३९ धावा तर शार्दूल ठाकूरने ३ षटकांमध्ये ४२ धावा दिल्या.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# विद्यानिकेतन सीबीएससी शाळेत सामान्य ज्ञान स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद





परळी वैजनाथ | प्रतिनिधी

विद्यानिकेतन सीबीएससी शाळेमध्ये सामान्यज्ञान स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व सक्रियपणे सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत इयत्ता पहिली ते सहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेची पहिली फेरी (प्रथम फेरी) प्रत्येक वर्गात घेण्यात आली, ज्यामध्ये प्रत्येक वर्गातून चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या फेरीत (द्वितीय फेरी) या निवडलेल्या विद्यार्थ्यांमधून पहिला व दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये जलद उत्तर देण्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक महत्त्वाची कौशल्ये विकसित होतात. त्वरित विचार करण्याची क्षमता विकसित होते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता, एकाग्रता, स्मरणशक्ती, आत्मविश्वास, वेळेचे व्यवस्थापन, स्पर्धात्मक वृत्ती व ताण-तणाव हाताळण्याची क्षमता विकसित होते. ही सर्व कौशल्ये विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# महिलांचा हक्क नाकारण्याची किंमत विरोधकांना मोजावी लागेल : ना. पंकजाताई मुंडे

## ठाण्यात पत्रकार परिषद ; महिला आरक्षणाला विरोध हे अत्यंत निषेधार्ह

मुंबई | प्रतिनिधी

महिला आरक्षण विधेयक नाकारले गेले, तेव्हा देशातील प्रत्येक महिलेला प्रताडित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. महिलांचा हक्क नाकारणे हे अत्यंत निषेधार्ह असून काँग्रेससह सर्व विरोधकांना याची किंमत मोजावी लागेल असा इशारा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेतून दिला. काँग्रेस पक्ष देशाला स्वतःची मालमत्ता समजतो, हीच त्यांची मानसिकता आहे' असंही त्यांनी स्पष्ट केलं.

ठाणे येथे भाजप विभागीय कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. भाजप नेत्या माधवी नाईक, जिल्हाध्यक्ष संदीप लेले तसेच समीरा भारती, स्वप्नाली साळवी, वंदना डोंगरे, वनिता बोथपगारे आदी महायुतीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ला विरोध करणाऱ्या काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांच्या भूमिकेचा ना. पंकजाताईंनी यावेळी निषेध केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आणलेल्या ऐतिहासिक 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ला विरोध करून काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी देशातील कोट्यवधी महिलांच्या आकांक्षांचा आणि हक्कांचा घोर अवमान केला आहे.वर्षानुवर्षे महिला आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित ठेवणाऱ्या विरोधकांनी संसदेत या विधेयकाविरोधात भूमिका घेऊन आपली महिलाविरोधी मानसिकता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश महिलांच्या सक्षमीकरणासाठी पावले उचलत असताना, विरोधकांचा हा अडथळा देशातील जनता कधीही विसरणार नाही असं त्या म्हणाल्या.

### भाजप जोरदार लढा देईल

महिला सक्षमीकरण आणि लोकशाही बळकट करण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबध्द आहे, महिलांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी या महिलांविरोधी शक्तीविरूध्द आम्ही जोरदार लढा देऊ असं त्या म्हणाल्या. काँग्रेस, समाजवादी पक्ष, टीएमसी आणि डीएमके या पक्षांनी केवळ घटनादुरुस्ती किंवा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांनाच विरोध केला नाही तर त्यांनी भारतातील लाखो माता-भगिनी आणि मुलींचा विश्वासघात केला आहे असा आरोप ना. पंकजाताईंनी केला.




# पेठ बीड पोलिसांची मोठी कारवाई; जनावरे चोरणाऱ्या टोळीला अटक, ४ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त



बीड | प्रतिनिधी

पेठ बीड पोलिसांनी जनावरांची चोरी करणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश केला असून, तीन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी एक गो-हे आणि चोरीसाठी वापरलेली बोलेरो पिकअप असा एकूण ४ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### नेमकी घटना काय?

दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर हे आपल्या कर्मचाऱ्यांसह पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, जी. एन. फंक्शन हॉल जवळ काही लोकांनी जनावरे चोरणारे लोक आणि त्यांचा टेम्पो पकडून ठेवला आहे. माहिती मिळताच खेडकर यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली.

तेथे पोलिसांनी संशयित बोलेरो पिकअप (क्र. MH 23 AU 1015) ताब्यात घेतली. गाडीची झडती घेतली असता, त्यात एक गो-हे अत्यंत क्रूरपणे पाय बांधलेल्या अवस्थेत आढळून आले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तिघांची कसून चौकशी केली असता, त्यांनी सदर गो-हे कत्तल करण्याच्या उद्देशाने चोरून नेत असल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत:

१. अशीम जाफर कुरेशी (रा. महमदीया कॉलनी)

२. अजिम आझाद कुरेशी (रा. महमदीया कॉलनी)

३. कुरेशी शहनवाज कुरेशी एजाज (रा. कुरेशी मोहल्ला, पेठ बीड)

फिर्यादी सईद अब्दुल करीम कुरेशी (वय ५१ वर्ष, रा. मोमीनपुरा) यांच्या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ११६/२०२६ नुसार कलम ३०३ (२), ३(५) बीएनएस सह ५(११), ५(अ), ८ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी १५ हजार रुपये किमतीचे जनावरे आणि ४ लाख रुपयांची बोलेरो पिकअप असा एकूण ४,१५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम भा.पो.से. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पीएसआय मन्सूर शहा, पोहेका सुभाष मोठे, नितीश माने, अजित शिकतोड, विष्णू गुजर, गिरी, अशोक परझने आणि शिवाजी राख यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस हवालदार माने करत आहेत.

# निकालाच्या धावपळीत निवडणूक कर्तव्य

## शासन मायबाप शिक्षकांनी करावं तरी काय?

परळी / प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष अंतीम टप्प्यावर असून राज्य स्तरावर घेण्यात येत असलेल्या संकलित चाचणी 2 (PAT 3) या परीक्षेचे मूल्यमापन पूर्ण करून ऑनलाईन पद्धतीने शासन स्तरावर नोंदी करून शालेय स्तरावर निकाल पत्रक 1 मे पूर्वी पूर्ण करणे क्रमप्राप्त असताना तहसील प्रशासनाने खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक कर्मचारी यांनी पोट निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती दिल्याने नियुक्त कर्मचा-यांनी नेमकं करायचं काय? हा प्रश्न निर्माण झाला आहे.




राज्य अभ्यासक्रम मंडळाच्या नियोजनाप्रमाणे या शैक्षणिक वर्षातील अंतिम चाचणी दि 22 एप्रिल रोजी समाप्त होत आहे. नियमानुसार विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल हा दि 1 मे रोजी जाहीर करणे क्रमप्राप्त असते. मागील काही वर्षांपासून शासन स्तरावर संकलित मूल्यमापन चाचणी घेण्यात येत असून या चाचणी मधील विद्यार्थीनिहाय अध्ययन निष्पत्ती निहाय प्राप्त गुण हे शासनाच्या चॅट बॅट प्रणालीवर ऑनलाइन पद्धतीने नोंद करणे बंधनकारक केले आहे. खाजगी अनुदानित शाळेतील एक शिक्षक कर्मचारी यांच्याकडे किमान चार वर्ग अध्यापन आणि 200 ते 300 उत्तरपत्रिका मूल्यांकन काम पूर्ण करावे लागते. या शैक्षणिक वर्षात शासन स्तरावरील संकलित चाचणी 2 ही दि 22 रोजी समाप्त होत असून मोजक्या दिवसात एवढ्या सर्व विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिका मूल्यांकन काम करणे, प्रश्ननिहाय प्राप्त गुण शासनाच्या पोर्टलवर नोंद करणे आणि आपला वर्गाचा अंतिम निकाल पत्रक तयार करून विद्यार्थी गुणपत्रक तयार करणे एवढे सर्व काम मोजक्या दिवसात करणे क्रमप्राप्त आहे.

रात्र थोडी सोंगे फार अशी अवस्था असताना आपलं झालं थोडं आणि इवयाने धाडलं घोड अस परळी तालुक्यातील शिक्षकांची अवस्था बनली असुन

या सर्व धाकधूकीत पोट निवडणूक संदर्भात तालुक्यातील काही खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना या कामी नियुक्ती देण्यात आली आहे. दि 22 रोजी प्रशिक्षण, दि 27 रोजी साहित्य हस्तगत करणे आणि दि 28 रोजी मतदान प्रक्रिया हे सर्व काम करून नियुक्ती कर्मचारी यांनी शालेय विद्यार्थ्यांचे वार्षिक मूल्यांकन कधी करावे? गुण ऑनलाइन पद्धतीने कधी भरावे? वार्षिक निकाल पत्रक तयार करून विद्यार्थी गुणपत्रक कधी लिहावे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. वास्तविक पाहता जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळा, इतर विभाग यांच्याकडे पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध असताना देखील जाणीवपूर्वक परळी तालुक्यात तहसील प्रशासन खाजगी शाळेतील शिक्षकांना विविध कामावर नियुक्ती देत असल्याची खंत (चीड) कर्मचारी दाखवून देत आहेत.

# सनगाव येथे दत्तक पालक योजनेअंतर्गत विद्यार्थिनीची भेट ; अनुलोमच्या कार्याचे कौतुक

केज प्रतिनिधी :-

केज तालुक्यातील सनगाव येथे आज दत्तक पालक योजनेसंदर्भात जिल्हा परिषद शाळेत भेट देण्यात आली. यावेळी अनुलोम परिवाराचे सदस्य युवराज मुंडे यांनी संपर्क साधून गावातील इयत्ता ७ वीतील विद्यार्थिनी आकांक्षा हिची भेट आयोजित केली.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक केशव कुसरे, धिमे सर, अमोल अंजान तसेच रणजित मुंडे यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. या भेटीदरम्यान अनुलोमच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.



कार्यक्रमात गोविंद तांदळे (केज भाग जनसेवक) यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच प्र स नेतृत्व गिरवलकर हे देखील उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# भांडुप येथे भव्य आगरी वधु –वर मेळाव्याचे आयोजन

मुंबई | पंकजकुमार पाटील

सध्या लग्न सराईचे दिवस सुरु आहेत. घरोघरी पालक, नातेवाईक आपल्या मुलांसाठी सुयोग्य वधु वा वर शोधण्याच्या तयारीला लागलेले दिसतात. पालकांचा हा लग्नाचा ताण हलका करून त्यासाठी सहकार्य करायला मुंबईतील आगरी समाज विकास संघ दरवर्षी वधु वर मेळावे भरवून समाजकार्य करण्याचे काम करीत असतो .

हाच हेतू समोर ठेऊन आगरी समाज विकास संघ, मुंबई व स्व. दीना बामा पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीने भव्य आगरी वधु -वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळावा रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता स्व. दीना बामा पाटील प्रतिष्ठान, भांडुप स्टेशन रोड, भांडुप (पश्चिम ), मुंबई याठिकाणी आयोजित करण्यात आला आहे .



या कार्यक्रमासाठी वधू वर यांनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. सोबत नवीन उमेदवार असेल तर ३ बाय ४ चे दोन फोटो, तसेच उमेदवाराची जुनी नोंद असल्यास संस्थेने दिलेली नोंदवही आणण्याची सूचना करण्यात आली आहे. तेव्हा या मेळाव्यासाठी आगरी समाजातील इच्छुक वधु - वर उमेदवारांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे . अधिक माहितीसाठी धनाजी म्हात्रे- 98690 07754, सागर पाटील- 97735 29747, संजय म्हात्रे- 99679 72206, श्याम नाकटे- 99696 20057 यांच्याशी संपर्क साधावा.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, बुधवार 22 एप्रिल 2026





# परळीत 'अतिक्रमण हटाव' मोहिमेत पक्षपातीपणा नको, सर्वांना सारखा न्याय द्या!

## माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांचा प्रशासनाला इशारा
## व्यापाऱ्यांच्या भेटीनंतर मांडली आक्रमक भूमिका



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):**

परळी नगर परिषदेच्या वतीने शहरात सध्या राबवण्यात येत असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत पक्षपातीपणा करू नये. रस्त्यावरील वाढत्या अतिक्रमणांमुळे भाविक आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे हे अतिक्रमण कोणत्याही भेदाभेदाशिवाय सरसकट काढण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केलीआहे. व्यापारी व नागरिकांना विश्वासात घेऊन, सर्वांना सारखा न्याय देऊन ही मोहीम राबवावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी आज मोंढा परिसरात जाऊन स्थानिक व्यापाऱ्यांची भेट घेतली आणि नगर परिषदेच्या मोहिमेची पाहणी केली. यावेळी व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडे आपल्या अडचणी मांडल्या. या भेटीनंतर बोलताना देशमुख म्हणाले की, परळी हे ज्योतिर्लिंग वैजनाथाचे पावन क्षेत्र असल्याने येथे देशभरातून भाविक येतात. मात्र, मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे या भाविकांना आणि स्थानिकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागते. नगर परिषदेने ही मोहीम राबवताना कुणाचे हित न पाहता रस्ते मोकळे करावेत. मात्र रस्त्यावरील आणि फूटपाथवरील अतिक्रमण काढताना गरिबांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. मोठ्यांचे अतिक्रमण काढताना नगर परिषद नरमाईची भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

प्रशासनाने आधी पार्किंगची योग्य व्यवस्था करावी आणि फूटपाथवरील फेरीवाल्यांचे अतिक्रमण काढण्यापूर्वी त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करावे असेही देशमुख यांनी स्पष्ट केले. तसेच अतिक्रमण सीमा निश्चित करून खुणा कराव्यात. तोंड बघून अतिक्रमण न काढता व्यापारी व नागरिकांना विश्वासात घेऊन ही मोहीम राबवावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी केली आहे. याबाबत दीपक देशमुख यांनी नगरसेवक नितीन बागवाले, व्यंकटेश शिंदे, शिवसेना शहराध्यक्ष वैजनाथ माने, वैजनाथ जोशी, गोविंद माने आदींसह न. प. उपमुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

**व्यापाऱ्यांच्या समस्या आणि प्रत्यक्ष पाहणी -**

दीपक देशमुख यांनी आज मोंढा परिसरात जाऊन स्थानिक व्यापाऱ्यांशी संवाद साधला आणि सुरू असलेल्या मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाईबाबत आपल्या अडचणी त्यांच्यासमोर मांडल्या.



# देव माणूस डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी-आ. कराड

**लातूर | प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राजश्री शाहू कॉलेजच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले करणारे आणि ग्रामीण भागात मोफत वैद्यकीय सेवा देणारे देव माणूस म्हणून ओळख असलेले भाजपाचे माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या दुःखद निधनाने वैद्यकीय क्षेत्रासह शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची भावना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी व्यक्त केली.

लातूर येथे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात वेगळा ठसा निर्माण करणारे ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व, शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजर्षी शाहू महाविद्यालयाचे सर्वेसर्वा भाजपाचे माजी राज्यसभा सदस्य खासदार डॉ. गोपाळराव पाटील (आप्पा) यांचे आज मंगळवारी वृद्धापकाळाने निधन झाले. अत्यंत शिस्तप्रिय आणि अभ्यासू व्यक्तिमत्व असलेल्या डॉ. गोपाळराव पाटील यांनी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य केले आहे.

विविध भाषेवर प्रभुत्व असलेल्या डॉ. गोपाळराव पाटील यांच्या दुःखद निधनाबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी शिवछत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना करून राजश्री शाहू महाविद्यालयाच्या माध्यमातून गुणवत्तेच्या जोरावर लातूर पॅटर्न शिक्षण पद्धती विकसित केली या लातुर पॅटर्नची राज्यात देशात नाहीतर जागतिक स्तरावर चर्चा झाली हे कायम स्मरणात राहणारे आहे.

शिक्षण क्षेत्रातील उतुंग व्यक्तिमत्व असलेल्या डॉ. गोपाळराव पाटील यांनी बारा वर्षे मूरूड परिसरात आणि इतर ग्रामीण भागात विनामूल्य वैद्यकीय सेवा देऊन समाजात विशेष स्थान निर्माण केल्याने त्यांची देव माणूस म्हणून ओळख निर्माण झाली होती. राज्यसभेचे खासदार म्हणून त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण विषयात आपले योगदान दिले आहे. सर्वात्कृष्ट डॉक्टर संसदपटू हा त्यांना सन्मान देऊन गौरव करण्यात आला होता. अत्यंत शिस्तप्रिय असलेल्या डॉ. गोपाळराव पाटील यांच्या दुःखद निधनाने आरोग्यसह, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. हे दुःख सहन करण्याची ताकद परमेश्वराने पाटील परिवाराला द्यावी अशी प्रार्थना करून माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



# सौर अनुदानाला भ्रष्टाचाराचे ग्रहण!

## आष्टी महावितरणच्या सहायक अभियंता 18 हजारांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात



**आष्टी (प्रतिनिधी)**

राज्यात एकीकडे हरित आणि अपारंपरिक ऊर्जेला प्रोत्साहन दिले जात असताना, दुसरीकडे याच लोकोपयोगी योजनांना प्रशासकीय पातळीवर भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.सौर प्रकल्पाची पडताळणी करून देण्यासाठी तब्बल १८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना आष्टी येथील महावितरण कार्यालयातील सहायक अभियंता कोमल अर्जुन शिंदे यांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी रंगेहात बेड्या ठोकल्या आहेत. या धडक कारवाईमुळे महावितरण वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.शासनाकडून नैसर्गिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर करून वीज निर्मिती करण्याच्या प्रकल्पांना,विशेषतः सौर ऊर्जा प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे.यासाठी शेतकरी आणि नागरिकांना घसघशीत अनुदानही दिले जाते.मात्र हे अनुदान पदरात पाडून घेण्यासाठी आणि तांत्रिक सोपस्कार पूर्ण करण्यासाठी काही भ्रष्ट अधिकारी सामान्य नागरिकांची कशी अडवणूक करतात,हे या प्रकरणातून उघड झाले आहे. तक्रारदाराने उभारलेल्या सोलर प्रकल्पाची अधिकृत पडताळणी करून देण्याचे काम सहायक अभियंता कोमल शिंदे यांच्याकडे होते.हे काम विनाअडथळा मार्गी लावण्यासाठी शिंदे यांनी तक्रारदाराकडे मोबदल्याच्या स्वरूपात १८ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी लाच द्यावी लागत असल्याने,संतप्त तक्रारदाराने थेट बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यालय गाठले आणि यासंदर्भात रीतसर तक्रार दाखल केली.तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत गुप्तपणे या तक्रारीची पडताळणी केली. पडताळणीमध्ये कोमल शिंदे यांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर एसीबीच्या पथकाने मंगळवारी आष्टी येथे अत्यंत शिताफीने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून १८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना सहायक अभियंता कोमल शिंदे यांना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले.पुढील तपास सुरू ही धडक कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या विशेष पथकाने केली आहे.एका महिला अधिकाऱ्यालाच लाच घेताना अटक झाल्याने महावितरण विभागात एकच खळबळ उडाली असून,लाचखोर अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, शिंदे यांनी यापूर्वीही अशा प्रकारे शेतकऱ्यांची किंवा नागरिकांची अडवणूक केली आहे का? त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची काही माहिती मिळते का? यादृष्टीने एसीबीकडून आता सखोल तपास सुरू करण्यात आला आहे.नागरिकांच्या हक्काच्या अनुदानावर डल्ला मारणाऱ्या अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई होण्याची अपेक्षा सर्वसामान्यांमधून व्यक्त केली जात आहे.

# राम कुलकर्णी यांची भारतीय जनता पक्षाच्या राज्य प्रवक्तेपदी फेरनिवड

## कुलकर्णी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांनी जाहीर केलेल्या नवीन कार्यकारिणीत राम कुलकर्णी यांची भाजपा राज्य प्रवक्तेपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. कुलकर्णी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

पक्ष संघटन बळकट करण्याच्या उद्देशाने, घोषित करण्यात आलेल्या नव्या कार्यकारिणीत अनुभवी नेत्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे, ज्यामध्ये राम कुलकर्णी यांचा समावेश आहे. संघटनात्मक फेररचना आणि आगामी निवडणुकांसाठीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर कुलकर्णी यांची निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्याला कारण ही तसेच आहे. राम कुलकर्णी हे यापूर्वीही भाजपाचे राज्य प्रवक्ते म्हणून जबाबदारी सांभाळत असून, शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्या विधानांना वेळोवेळी जशास तसे प्रत्युत्तर दिल्यामुळे कुलकर्णी हे चर्चेत आले होते. भाजपाने प्रदेश प्रवक्ता विस्तारित यादी जाहिर केली असून त्यात ज्येष्ठ पत्रकार राम कुलकर्णी यांची पुन्हा प्रदेश प्रवक्ता म्हणुन फेरनियुक्ती करण्यात आली. मागच्या 8 वर्षांपासून मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्रजी चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे, महसूलमंत्री ना.बावनकुळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवक्तेपदी काम करताना संघटनात्मक कार्य आणि पक्षाची बाजू माध्यमांकडे प्रभावीपणे मांडण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले. बीड जिल्ह्यातील ते ना.पंकजाताई यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या पुनर्नियुक्तीमुळे बीड जिल्ह्यात आनंद व्यक्त होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. 2019 साली प्रदेश प्रवक्ता म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. मागील 8 वर्षे प्रसारमाध्यमांत त्यांनी केलेले लिखाण इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर मांडलेली बाजू एवढेच नव्हे तर विरोधकांवर तुटुन पडणारा, स्पष्ट वक्ता, परखड बोलणारा प्रवक्ता अशी त्यांची ओळख आहे. प्रदेश संघटनात्मक बदल झाल्यानंतर काही दिवसांपुर्वी प्रवक्ता पुनर्रचना प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. त्यात विस्तारित प्रवक्ता यादी आज पुन्हा जाहिर करण्यात आली असून कुलकर्णी यांना प्रदेश प्रवक्ते म्हणुन पुन्हा घोषित करण्यात आल्याचे पत्र प्रदेशाध्यक्ष आ.चव्हाण यांनी काढले. राम कुलकर्णी हे पत्रकारितेच्या माध्यमातून तब्बल 33 वर्षांपासून बीड जिल्ह्याच्या समाजकारण आणि राजकारणात काम करतात. त्यांनी दिवंगत नेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे सोबत 30 वर्षे काम केले. पक्षाचा विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसारमाध्यमांतून परखड विचार मांडले, स्पष्टवक्तेपणा ठेवला आणि ठाम भूमिका घेतली. स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे पट्टशिष्य म्हणून विशेष ओळख आहे.



राजकिय विश्लेषक म्हणून त्यांचे लिखाण नेहमीच चर्चेत असते. विविध क्षेत्रात त्यांची भरीव कामगिरी आहे. पत्रकारिता, शिक्षण, राजकारण, समाजसेवा आणि अध्यात्मिक क्षेत्रात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. एक वास्तववादी लिखाण करणारा पत्रकार ही पण त्यांची ओळख आहे. सध्या ते उज्जैन (इंदौर) येथे भाजपाच्या राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी आहेत. तिथे त्यांना त्यांच्या फेरनिवडीची माहिती प्राप्त झाली. प्रवक्तेपदी नांव घोषित होताच भाजपाचे राष्ट्रीय, राज्य, विभागीय आणि जिल्हा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रमुख नेते, मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ते भारतीय जनता पक्ष अशी राजकीय वाटचाल करताना, विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी घेतलेला विधायक पुढाकार या दरम्यान पुन्हा एकदा प्रवक्तेपदी पक्ष नेतृत्वाने मला संधी देवून माझ्यावर जो विश्वास टाकला. तो आपल्या कामातून सेवाभाव वृत्तीने पुढे जाताना सार्थ करून दाखवू असे राम कुलकर्णी यांनी सांगितले आहे.

**ना.पंकजाताई यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते :**

बीड जिल्ह्यात पक्षाचे काम करीत असताना राम कुलकर्णी हे ना.पंकजाताई यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. मागील अनेक वर्षांपासून ते मुंडे कुटुंबियांचे निष्ठावंत सहकारी आहेत.

**पक्ष नेतृत्वाचा विश्वास सार्थ ठरविणार :**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे, महसूलमंत्री ना.बावनकुळे साहेब, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आमदार सौ.नमिताताई मुंदडा, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्यासह बीड जिल्ह्यातील भाजपाचे सर्व सन्माननीय आमदार, माजी आमदार, माजी खासदार, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी माझ्या पक्ष कार्यावर जो विश्वास दाखवून माझी फेरनिवड केली. त्याबद्दल पक्ष नेतृत्वाचे जाहीर आभार व्यक्त करून माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरविणार आहे असे नवनियुक्त भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले.